अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

**महाराष्ट्र शासन**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**कार्यालय- कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६**
**फॅक्स क्र. ०२४२६-२४३८१६**
**ई-मेल** registrar.mpkv@nic.in

**पत्ता :- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, प्रशासकीय इमारत,**
**मध्यवर्ती परिसर, राहुरी,**
**ता. राहुरी, जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.**

जा.क्र./का.व्य./गणवेश/ 1387 /२०२२,

दिनांक - ६ /०९ /२०२२.

विषय : चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले गणवेश कार्यालयीन वेळेत परिधान करणेबाबत..

संदर्भ : सामान्या प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-गणवेश-३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९, दि.२६/०३/२००८.

## परिपत्रक

विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध कार्यालयांच्या अधिनस्त कार्यरत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना कार्यालयामार्फत गणवेश देण्यात येतात. तथापि, अदयापही काही कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त कार्यरत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविले नसल्याचे कोल्हापूर विभागाच्या आढावा बैठकीवेळी निदर्शनास आले आहे. तसेच, ज्या कार्यालयांनी गणवेश पुरविले आहेत अशा कर्मचाऱ्यांनी सदरचे गणवेश नियमितपणे कार्यालयीन वेळेत परिधान करणे आवश्यक असताना सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे निम्नस्वाक्षरीकार यांचे निदर्शनास आले आहे.

सबब, पुनश्च एकदा सर्व कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते कि, त्यांच्या अधिनस्त असलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश उपलब्ध करून दयावेत व नियमितपणे गणवेश परिधान करणेविषयी आवश्यक सूचना दयाव्यात. तसेच, गणवेश परिधान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व आपिल) नियम, १९७१ मधील नियम क्रमांक १० खाली शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची सूचना शासनाच्या संदर्भीय निर्णयाव्दारे केली असल्याची जाणीव संबधीत कर्मचाऱ्यांना करुन दयावी.

(प्रमोद लहाळे)
**कुलसचिव**

प्रत : विदयापीठ कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालये / योजना प्रमुख यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत : मा. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक , मफुकृवि., राहुरी यांना माहितीसाठी.